

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा 'क्लबच्या पदाधिकाऱ्यांचा स्थापना समारंभ

## क्विक हिल सायबर वॉरियर क्लब शंकरलाल खंडेलवाल कॉलेज अकोला

✍️अकोला .शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा 'क्लबच्या पदाधिकाऱ्यांचा स्थापना समारंभ क्विक हील फाउंडेशन आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात दि. २३ जून २०२६ रोजी पुणे येथे उत्साहात पार पडला.

या पदाधिकारी स्थापना समारंभाचे प्रमुख अतिथी मा.श्री. अनुपमा काटकर यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना स्कार्फ व बॅच प्रदान करून गौरविण्यात आले.

यामध्ये डॉ. दीप्ती हेमंत पेठकर यांची शिक्षक समन्वयक, आदित्य संजय गोतमारे यांची अध्यक्ष, ओम पुरुषोत्तम गुजर यांची सचिव, कु. सिया उमाशंकर अग्रवाल ही मीडिया डायरेक्टर तसेच कु. तृप्ती राजू निळकंठ ही ॲक्टिव्हिटी डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या प्रशिक्षण सत्रात मा. अजय शिर्के, मा. गायत्री केसकर, मा. दिपू सिंह यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या अध्यक्षा मा.डॉ. ताराताई हातवळणे, मा. सचिव गोपालजी खंडेलवाल, मा. प्राचार्य डॉ. जे. एम. साबू तसेच सर्व पदाधिकारी व प्राध्यापक यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भविष्यात महाविद्यालय व समाजात सायबर सुरक्षा जनजागृतीचे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यास शुभेच्छा दिल्या.

---

**SUPER NEWS 24(मराठी)**